# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**आस्थापना विभाग**

पत्ता:- छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन, १ ला माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर
(फोन नं. **२५६७०३२**) email- gadnmcnagpur@gmail.com

**जाहिरात क्र. ५०/पी.आर./२०२३** **दिनांक:- २४/०४/२०२३**

## थेट मुलाखत

**कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक ६ महिण्याकरिता निश्चित माधनावर नियुक्त करणे.**

नागपूर महानगरपालिकेच्या क्रिडा विभागात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची क्रिडा विषयक प्रगती, सहभाग व अनुषंगीक समन्वय, पर्यवेक्षण या दृष्टीने, १ पद निव्वळ **कंत्राटी तत्वावर प्रथमत: ६ महिन्याच्या कालावधीकरीता** भरावयाचे असुन इच्छुक उमेदवारांनी खालील पदाकरीता दिनांक ०४/०५/२०२३ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ११.३० वाजेपर्यंत, तळ मजला, नवीन प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स, नागपूर येथे नोंदणी करावी. विहीत वेळेनंतर येणा-या उमेदवारांच्या नावाची नोंदणी करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | अनुज्ञेय मासिक परिश्रम | वयोमर्यादा | पदांचा संवर्ग | किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक | १ | रु. २०,०००/- | ४० वर्ष | खुला | **शैक्षणिक पात्रता** :-<br>अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी<br>ब) मान्यता प्राप्त विद्यापिठाची शारिरीक शिक्षण शाखेची पदवी (बी.पी.एड).<br>क) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग. |

- नोंदणी करीता येतांना उमेदवारांनी आपल्या शैक्षणीक पात्रता, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/जन्म प्रमाणपत्र, तसेच अनुभव प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत अर्जासह टाचन करुन एक प्रत सोबत ठेवावी तसेच (मुळ प्रमाणपत्र सोबत ठेवावे)

**अ) अहर्ता :-**

१. अर्ज विहीत नमुन्यात परिपूर्ण व अचुक माहिती व सर्व संबंधीत दस्ताऐवज स्वयंसाक्षांकित करुन उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणीक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्वयंम सांक्षाकित करून दोन प्रतीत सोबत ठेवून एक प्रत नमुना अर्जासोबत जोडाव्या व एक प्रत सोबत ठेवावी.
२. मुळ शैक्षणीक पात्रतेच्या प्रती सोबत नसल्यास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येईल.
३. अर्जासोबत अलीकडील पासपोर्ट साईजचा एक फोटो चिटकवून १ फोटो उजव्या बाजूस टाचन करावे.
४. उमेदवारास इंग्रजी व मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.
५. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे अधिवास प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-याकडून घेतलेले असावे (डोमेसाईल/नॅशनॅलिटी) प्रमाणपत्र आवश्यक राहील. (अर्जा सोबत जोडावे)

६. उमेदवारानी संगणक हाताळणी बाबत एम.एस.सी.आय.टी. परिक्षा वा तत्सम परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी. (अर्जा सोबत जोडावे)

७. उमेदवारांनी नोंदणी करतांना संबधीत पदाकरीता अपात्र आढळल्यास उमेदवारांची नोंदणी करण्यात येणार नाही.

८. वयोमर्यादा विचारात घेतांना मुलाखतीचा दिनांक हिच तारीख ग्राहय धरण्यात येईल.

९. थेट मुलाखत असल्याने टपाल व इतर मार्गाने अर्ज पाठविण्याची आवश्यकता नसल्याने अशा अर्जावर विचार करण्यात येणार नाही.

१०. सदर पदांची नेमणूक ही पुर्णत: **<u>कंत्राटी</u>** पध्दतीने असेल.

११. या पदावरील कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

१२. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महानगरपालिका आयुक्त/प्रशासक नागपूर महानगरपालिका, सिव्हील लाईन्स नागपूर यांचे नावे भरून व इतर शैक्षणीक दस्ताऐवजासह स्वक्षांकित करून नियोजीत प्रपत्रात (अर्जाच्या नमुन्यात) सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाईल.

१३. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज सादर करतांना पदवीत्तर पदवीच्या गुणपत्रिकेत अर्ज भरतांना त्यांना प्राप्त १०० टक्के गुणांपैकी च्या टक्केवारीत अर्जात नमुद करावे.

१४. वरील पदात काही कारणास्तव बदल झाल्यास याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त/प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना राहतील. तसेच निवड प्रक्रियेच्या अटी/शर्ती तसेच कार्यपध्दतीत आवश्यक बदल/सुधारणा कोणत्याही टप्प्यावर करण्याचा अधिकार आयुक्त/प्रशासक, महानगरपालिका, नागपूर यांना राहिल.

१५. शासन निर्णय दिनांक ९ फेब्रुवारी २०१८ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पध्दती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचा-यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमूद असल्याने ही सर्व पदे **<u>निव्वळ कंत्राटी</u>** स्वरूपाची असुन पुढे नियमित करण्यात येणार नाहीत.

१६. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पुर्ण करण्याची जवाबदारी संबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र उमेदवारा कडून रुजू होताना संबंधीत विभाग प्रमुख भरुन घेतील. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती, व विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती नुसार करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी/उजर करण्यात येणार नाही, या बाबतचे बंधपत्र/ हमीपत्र उमेदवाराला दयावे लागेल.

१७. उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखती दरम्यान वा प्रकियेदरम्यान राजकीय दबाव वा वशिला आणल्यास उमेवारी अर्ज नामंजूर करण्यात येईल.

१८. उमेदवारांच्या मुलाखतीची वेळ अर्जाच्या नोंदणी झाल्यानंतर लगेच त्याच दिवशी दुपारी १२.०० वाजता नोंदणी क्रमांकानुसार प्रत्यक्ष मुलाखत सूरू केल्या जाईल. या बाबत उमेदवारास वेगळयाने सुचना देण्यात येणार नाहीत.

१९. थेट मुलाखतीस जास्त उमेदवार उपस्थित झाल्यास परिस्थितीनुरूप गुणवत्तेनुसार मुलाखातीस बोलविण्यात येणा-या उमेदवाराच्या संख्या व थेट मुलाखतीचे तारखेत बदल करण्याचे अधिकार आयुक्त/प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना राहतील तथापी याबाबत वैयक्तीक रित्या उमेदवारांना कळविण्यात येणार नसून आवश्यक असल्यास याबाबतची सुचना मनपाचे संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल.

२०. उमेदवारांनी अधिक माहिती करीता अर्जाचा नमुना तसेच इतर अत्यावश्यक माहिती मनपाच्या www.nmcnagpur.gov.in या संकेत स्थळावरून प्राप्त करून घ्यावी. उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्य संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२१. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसावा.

२२. निवड झालेल्या उमेदवाराची वैद्यकिय तपासणी करण्यात येईल. वैद्यकिय अहवाल प्रतिकूल नसल्यास केलेली निवड व नेमणूक रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराची कामकाजाची वेळ ही कार्यालयीन वेळ राहील (९.४५ ते ६.१५).

२३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्र.अ.क्र. १००५/प्र.क्र. ३६/०५/१६-अ दिनांक २६/०५/२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील **प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.** (अविवाहीत उमेदवारांना सुध्दा **लागु नाही** असे नमूद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.)

**ब) निवड प्रक्रिया :-**

१. प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार व प्रत्यक्ष मुलाखतीत मिळालेल्या गुणानुक्रमे गुणवत्ता यादीतील उमदवारांची गुणवत्ता यादी तयार करून नागपूर महानगरपालिकेच्या www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर वर प्रसिध्द करण्यात येईल.

२. मुलाखती अंती प्राप्त गुणानुसार अंतीम गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येवून त्यानुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

हस्ता/-
राधाकृष्णन बी. (भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## **कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक** पदाकरिता सन २०२३-२४

## अर्जाचा नमूना

पास पोर्ट साईज फोटो

प्रति,
मा. आयुक्त/प्रशासक
महानगरपालिका, नागपूर

विषय :- कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक या पदासाठी अर्ज.
संदर्भ :- दैनिक ....................................वृत्तपत्रात प्रकाशित झालेली जाहिरात.

उपरोक्त जाहिरातीचे संबंधाने मी, खालील अर्जदार **कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक** या पदासाठी अर्ज करीत आहे व माझी आवश्यक माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | उमेदवाराचे पुर्ण नांव | नांव | वडीलांचे नांव | आडनाव |
| | (मराठीमध्ये) | | | |
| | (इग्रंजीमध्ये) | | | |

| | | |
|---|---|---|
| २. | पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता, दुरध्वनी/भ्रमणध्वणी क्रमांक व ई-मेल आय.डी. | ........................................................................................................................................<br>.........................................................................................................<br>पिन कोड क्रमांक ..........................................<br>ई-मेल आय.डी. ..........................................<br>व्हाट्स ॲप भ्रमणध्वनी क्र. .......................................... |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | जन्म तारीख (अंकात) | D | D | M | M | Y | Y | Y | Y |
| | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ४. | जन्म तारीख (अक्षरात) :- | ............................................................................................................... |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | दिनांक / /२०२३ रोजी वय | Y | Y | Y | Y | M | M | D | D |
| | | | | | | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | जन्म ठिकाण | गाव | तालुका | जिल्हा |
| | | | | |
| | अ) महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात काय ? (डोमेसाईल/नॅशनॅलिटी प्रमाणपत्र जोडावे) | होय/नाही | | |
| | ब) उमेदवार पुरुष आहे की स्त्री | पुरुष/स्त्री | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | **शिक्षण** | **तत्सम शैक्षणिक अर्हता (नमुद करणे)** | **विद्यापिठाचे नांव** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | एकुण गुण (अ) | प्राप्त गुण (ब) | टक्केवारी (अ/ब) X १०० |
| | **शैक्षणिक पात्रता :-**<br>अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी<br>ब) मान्यता प्राप्त विद्यापिठाची शारिरीक शिक्षण शाखेची पदवी (बी.पी.एड).<br>क) राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग.<br>**(नमुद करावे)** | | | पदव्युत्तर पदवी ची एकुण टक्केवारी (नमुद करणे) | | | |
| | **अनुभव :-** असल्यास नमुद करणे. | | | | किती वर्षाचा अनुभव (अंकात नमुद करणे) | | |
| | संगणक प्रमाणपत्र (एम.एस.सी.आय.टी.) वा तत्सम | | | | | | |
| | इतर अनुभव | | | | | | |

टिप:- १) अर्जासोबत शैक्षणीक पात्रता व अर्हतेचे प्रमाणपत्र तसेच तत्सम प्रमाणपत्र/फोटो/स्वाक्षरी इत्यादी टाचन करणे.
२) एक पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत चिटकवुन एक फोटो उजव्या बाजूस टाचन करणे.

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

**(नियम ४ पहा)**

**प्रतिज्ञापत्र**

अ) मी श्री. / श्रीमती / कुमारी......................................................................................................................
श्री ........................................................................यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय.............
वर्ष राहणार ...................................................................................... याद्वारे पूढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी ........................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................ (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यांनतर जन्माला आलेल्या मुंलाची संख्या ........ आहे (असल्यास जन्म दिनांक ..........................नमुद करावे)

३) हयात असलेल्या मुंलाची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक ०२ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलां मुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जानीव आहे.
(अविवाहीत उमेदवारानी नमुना -अ प्रतिज्ञापत्र लागु नाही असे नमुद करून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसल्यास अर्ज अपुर्ण आहे असे समजुन रद्द ठरविण्यात येईल)

ब) तसेच आपले कार्यालया करीता **कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक** ची पदे भरणे संबधी थेट मुलाखतीच्या अटी मी काळजी पूर्वक वाचल्या असून **कंत्राटी क्रिडा निरीक्षक व समन्वयक** पदाचे कार्य मी प्रामाणिक पणे पार पाडेल.

सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याचे पृष्ठयर्थ मी प्रमाणपत्राच्या सांक्षाकित सत्यप्रती जाहिरातीतील दिलेल्या क्रमानुसार अर्जासह सोबत जोडल्या आहे, व नमुद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळून आल्यास माझी या पदाकरिता उमेदवारी रद्द होईल. व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल याची मला जाणिव आहे. या बाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधन कारक राहिल व या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

स्थळ:-
दिनांक:- (उमेदवाराची स्वाक्षरी)